# SPANDAN CAREER INSTITUTE

THE WAY OF SUCCESS…

**B**

**प्रश्नपुस्तिका क्र.**
**BOOKLET No.** **ME2020**

**Total Que. : 60**
**Marks : 150**
**Time : 90 min**

**Mob. No. 9923262977**


**Date :05/01/2020**

**राज्यसेवा (पूर्व) सराव परिक्षा - 2020**
**विषय : — मराठी (Marathi) [066]**
**पेपर क्र. (६)**

## सूचना

१. सदर प्रश्नपुस्तिकेत ६० अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरूवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका पर्यवेक्षकाकडून लगेच बदलून घ्यावी.

२. आपला परीक्षा—क्रमांक हया चौकोनांत न विसरता बॉलपेनने लिहावा.




३. वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे न विसरता नमूद करावा.

४. अ) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला ४ पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना १,२,३ आणि ४ असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवर सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमूद करतांना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी.

५. सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. अशा प्रकारे प्रश्न सोडविणे सोयीस्कर आहे; पण एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नाकडे वळावे. अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नाकडे परतणे सोईस्कर ठरेल.

६. उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही.

७. प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच "उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार उत्तरापैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या **प्रत्येक चुकीच्या उत्तरांसाठी एक तृतीयांश गुण वजा करण्यात येतील**."

**Head Office : 1st Floor, Vidarbha Hindi Sahitya Sammelan, Jhansi Rani Sq. Sitabuldi, Nagpur-12.**

**Note : Test Series Paper Online available**

**Visit us**

www.spandancareers.org

**पुढील उतारा वाचून त्यावर आधारित १ ते ५ प्रश्नांची उत्तरे द्या.**

तुमच्या कामातील अर्थ शोधण्याचा एक मार्ग म्हणजे परिणाम फलक तयार करणे होय. या परिणाम फलकावर तुमच्या वाटचालीतील अशा वस्तु ठेवा ज्याबद्दल तुम्हाला सर्वात जास्त अभिमान आहे. एखाद्याला तुम्ही मदत केल्यानंतर त्याने तुम्हाला पाठवलेली ती धन्यवादाची चिठ्ठी असू शकेल किंवा ज्याने काही सकारात्मक बदल केला अशा एखाद्या प्रकल्पाचे ते चित्र असू शकेल. जसजसे तुम्ही या वस्तु फलकावर ठेवायला लागाल, तसे तुम्हाला जाणवणारे अर्थपूर्ण आणि उर्जादायी प्रवाह बघत रहा.

तुमच्या कामात अर्थ शोधात रहाणे हा जो काही तुमच्या मनात ठेवण्याचा प्रकार आहे तो काही कायम असा मोठा गहन करून ठेवण्याची गरत नसते. ती एक साधी म्हणजे तुमच्या सहकाऱ्याला काही मार्गदर्शन करण्यासाठी किंवा एखाद्याने केलल्या कामाचे कौतुक करण्यासारखी बाब आहे. जर आपण लोकांसंबंधी विचार करतांना आपल्या आयुष्याला काय अर्थ प्राप्त करवून देते असा करीत असू तर लोकांना मदत केल्याने आपल्या कामाला अर्थ प्राप्त होईल. त्यांना केली जाणारी ही मदत भव्य पातळीवरची असू शकेल – संस्थेच्या कामाद्वारे किंवा मग वैयक्तिकरित्या केलेली ती मदत असू शकेल. उदाहरणार्थ माझ्या आयुष्याचे ध्येय थोरपण मिळवण्याचे नसून इतरांना थोर होण्यासाठी सक्षम करवून देण्याचे आहे. मग ते माझे माझ्या कर्मचाऱ्यांबरोबर केलेले शिकवण्याचे काम असेल किंवा विद्यार्थ्यांबरोबर केलेले मार्गदर्शनाचे काम असेल किंवा मग माझ्या पाल्यांबरोबर पालक म्हणून काम केल्याचे असेल – ही सर्व कामे मला माझ्या ध्येयाला समजून घेण्याची संधी आणि जागा देत असतात.

प्रभावी नेतृत्व करण्याकरिता आपल्याला प्रथम आपले नेतृत्व करता आले पाहिजे. तुमची मूल्ये आणि तुम्हाला काय अर्थपूर्ण वाटते ते समजावून घ्या, आणि अशा आस्थापनेमध्ये असा जिथे ती मूल्ये जपली जातात, जेणेकरून तुमची नोकरी तुम्हाला तुमचे ध्येय अधिक चांगल्या रीतीने उमजवून द्यायला जागा उपलब्ध करून देईल. जेव्हा तुमच्याकडे हे असेल तेव्हा तुम्हाला तुमचे वरिष्ठ आणि सहकारी तुमच्या ध्येयाला प्राप्त करून देणारे जोडीदार वाटण्याची प्रक्रिया सोपी होईल. जेव्हा हे हाईल तेव्हा आस्थापनेचे ध्येय पुढे नेणे आणि त्यात रमण्याची प्रक्रिया अधिक सोपी होते. याशिवाय संभाषण महत्वाचे आहे. आपण तुटलेलो असतो जेव्हा आपल्याला वाटते की कामाचे महत्व नाही, जेव्हा आपण शिकायचे थांबतो किंवा जेव्हा आपल्याला वाटते की आपण या गावचेच नाही. आपल्या रोजच्या वेळेच्या आणि इतर व्यापाच्या मागण्यामुळे आपण अगदी सहज आपल्या कामापासून तुटू शकतो. आपल्या सहकाऱ्यांना भेटून त्यांच्याबरोबर कॉफीसाठी, त्यांच्या कामाबाबत जाणून घेण्यासाठी, त्यांच्या प्रेरणाविषयी जाणून घेण्यासाठी आणि स्वत:च्या प्रेरणा त्यांच्याबरोबर वाटून घेण्याकरिता वेळ काढा.

**१.** परिणाम फलक तयार करण्यामागचा हेतू काय आहे ?

अ. तुमच्याकडुन कामावर झालेल्या परिणामांची तपासणी करणे
ब. चांगल्या वस्तू गोळा करणे
क. तुमच्या आलेल्या प्रवाहांची तपासणी करणे

(१) अ आणि क (२) ब आणि क (३) फक्त ब (४) फक्त क

---

**२.** कोणत्या प्रकारच्या आस्थापनेत काम करणे तुमच्या करता सोपे असेल ?

अ. जिथे तुमच्या नेतृत्व गुणांना वाढवण्याकरता वाव आहे.
ब. जिथे तुमच्या मुल्यांची कदर करणारे वातावरण तुम्हाला मिळेल.
क. जिथे तुम्हाला सहकार्य करणारे वरिष्ठ आणि सहकारी मिळतात.

(१) फक्त ब (२) अ आणि क (३) फक्त क (४) अ,ब आणि क

---

**३.** पुढील पैकी कोणत्या परिस्थितीमध्ये आपण आपल्या कामापासून तुटू शकतो ?

(१) जेव्हा आपण शिकवणे थांबवतो
(२) जेव्हा आपण आपल्या दररोजच्या वेळेच्या गरजांमध्ये अडकतो
(३) दोन्ही १ आणि २
(४) दोन्ही नाही

---

**४.** पुढीलपैकी कोणती बाब आपल्या कामाला अर्थ प्राप्त करवून देऊ शकते ?

(१) लोकांना मदत करणे (२) स्वत:ला मदत करणे (३) स्वत:ची स्तुति करण (४) यापैकी नाही

---

**५.** वरील उताऱ्याच्या लेखकाचे ध्येय काय आहे ?

अ. स्वत:ला थोर बनवत असतांनाच लोकांना थोर होण्याकरिता सक्षम करणे
ब. चांगले पालकत्व निभावणे

(१) फक्त अ (२) फक्त ब (३) दोन्ही अ आणि ब (४) यापैकी नाही

---

**पुढील उतारा वाचून त्यावर आधारित ६ ते १० प्रश्नांची उत्तरे द्या.**

आजवर आपण कपडयांची काळजी घेत आलो. पण आता कपडेच आपली काळजी घेतील. हे काही विशिष्ट प्रकारचे कपडे आहेत. कपडयांत संवेदक बसलेले असतात. अपघात झाल्यावर आपल्याला डॉक्टरची गरज भासते अथवा अचानक आपल्याला हृदयविकाराचा झटका आला तरी डॉक्टरची गरज भासते. अशा वेळी त्या कपडयांत बसलेले छोटे छोटे संवेदक डॉक्टरांना बोलावतील. अशा कपडयांना चलाख कपडे म्हणतात. हे संवेदक फक्त डॉक्टरांना बोलावतील एवढेच नाही तर संवेदकांनी सांगितलेल्या पत्यातील बारकाव्यामुळे तुम्ही डॉक्टरकडे बिनचूक जाल अथवा डॉक्टर तुमच्यापर्यंत बिनचूक येऊन पोहोचतील. बुद्धिबळातील फाशाच्या आकाराचा संगणक हे काम करेल. स्त्रियांच्या कानातील छोटया दागिण्यात बसवलेला संगणकही हे काम करेल. यासाठी भूस्थिर उपग्रह त्याला मदत करेल. जगाच्या नकाशात आपण कोठे आहोत तेही तो दाखवेल. मनुष्याच्या शरीरातही आता छोटी छोटी उपकरणे बसवणे शक्य झाले आहे. इंग्लंडच्या रीडिंग विद्यापीठातील केव्हिन नावाच्या शास्त्रज्ञाने अशा प्रकारचे एक छोटे उपकरण आपल्या हातात बसवून घेतले आहे. उपकरणाने निर्माण केलेल्या तरंगाचा उपयोग करून तो दरवाजा उघडू—बंद करून शकतो. संगणक चालू करू शकतो, दिवे लावू शकतो आणि हे सर्व त्या त्या वस्तुंना प्रत्यक्ष हात न लावता. उदा. रिमोट कंट्रोल उपकरणाने आपण दूरदर्शन संच चालू करू शकतो — बंद करू शकतो अथवा मोटारगाडीचा दरवाजा उघडू — बंद करू शकतो. तसेच, आपल्या मेंदूत निर्माण झालेले संदेश आणि विचार एखाद्या यंत्राला आणि दुसऱ्या माणसाला सांगितले जातील अशी उपकरणे भविष्यात माणसात बसवली जातील. हया गोष्टी अशाच गतीने प्रगती करीत राहिल्या तर आपले अर्धे शरीर माणसाचे आणि अर्धे यंत्राचे बनेल. विज्ञानकथांन वर्णन केलेला माणूस जशा खूप गमतीजमतीच्या गोष्टी करतो तसे होईल. भविष्यात एखाद्या दिवशी आपण गाडी सुरू केली आहे असा विचार मनात येताच आपल्या शरीरात बसलेल्या उपकरणातून संगणकाला आज्ञा दिली जाईल आणि गाडी सुरू होईल. इलेक्ट्रॉनिक उपकरणांचे आकार लहान लहान होत चालले असून त्यांची ताकद मात्र वाढत आहे. याच्या मुळाशी ती सिलिकॉन मौलाची अंगठयाच्या नखाहून लहान असलेली चकती आहे. सिलिकॉन मौलामध्ये असलेले एकाहून एक विलक्षण गुणधर्म आपल्या आयुष्यात क्रांती घडवून आणत आहेत. पोलाद आणि प्लॅस्टिकची वार्षिक उलाढाल कित्येक कोटी टनात होत असते. त्या तुलनेत सिलिकॉनची उलाढाल किरकोळ असते. पण इलेक्ट्रॉनिक्स उद्योगाच्या संदर्भात सिलिकॉन हा फार महत्वाचा पदार्थ आहे. शुद्ध आणि उच्च जातीचे सिलिकॉन दरवर्षी नवीन आणि चांगल्या दर्जाची इलेक्ट्रॉनिक्स उपकरणे बनवण्यासाठी लागते. ग्राहकोपयोगी इलेक्ट्रॉनिक्स तंत्रज्ञानासाठी, संदेशवहनासाठी आणि आधुनिक संगणक बनवण्यासाठीचा मुख्य पदार्थ म्हणजे सिलिकॉन.

**६.** लेखकाच्या मते,

अ. केव्हिन वारविक यांनी आपल्या शरीरात एक छोटे उपकरण बसवले असून त्याच्या मदतीने ते अनेक कामे वस्तुंना प्रत्यक्ष हात न लावता देखील करू शकतात.

ब. माणसाने आपल्या मेंदूत तयार झालेले विचार दुसऱ्या व्यक्तिला व यंत्राला पोहचवतील अशी आकाराने सूक्ष्म यंत्रे बनवली आहेत.

(१) फक्त अ (२) फक्त ब (३) दोन्ही अ व ब (४) वरीलपैकी नाही.

---

**७.** अयोग्य विधान ओळखा.

अ. आपण जर सध्याच्या वेगाने विज्ञानात प्रगती करत राहिलो तर माणूस विज्ञानकथांतील गोष्टींसारख्या गमतीजमती करू शकेल.

ब. चलाख कपडे पार पाडत असलेली भूमिका स्त्रियांच्या कानातील दागिण्यांत बसवलेला संगणकही पार पाडू शकेल.

(१) फक्त अ (२) फक्त ब (३) अ व ब दोन्ही (४) दोन्ही योग्य

---

**८.** उताऱ्यावरून आपण निश्चित सांगू शकतो की,

अ. चलाख कपडे सिलिकॉनपासून बनलेली आहेत व ते वैद्यकीय आपत्कालीन परिस्थितीत डॉक्टरला बोलावतील.

ब. चलाख कपडयांनी डॉक्टरला बोलावल्यामुळे व आपण सांगितलेल्या नेमकया पत्यामुळे डॉक्टर वेळेवर येऊन आपला जीव वाचण्याची शक्यता अधिक आहे.

(१) फक्त अ (२) फक्त ब

(३) दोन्ही अ व ब (४) वरील विधानाविषयी निश्चित काही सांगता येणार नाही.

---

**९.** अयोग्य विधान ओळखा.

अ. प्लॅस्टिक व पोलाद यांची उलाढाल काही कोटी रूपयांत होत असते मात्र त्यामानाने सिलिकॉनची उलाढाल किरकोळ आहे.

ब. लेव्हिन वारविक आपल्या हातातील उपकरणाच्या साहाय्याने मोटारगाडी सुरू करू शकतो.

(१) फक्त अ (२) फक्त ब (३) दोन्ही अ व ब (४) दोन्ही विधाने योग्य

---



www.spandancareers.org

१०. वरील उताऱ्यास योग्य शीर्षक द्या.

(१) यंत्रे व मानव (२) बहुगुणी सिलिकॉन

(३) सिलिकॉन : इलेक्ट्रॉनिक्स क्रांतिचा शिल्पकार (४) इलेक्ट्रॉनिक्स व सिलिकॉन

---

**पुढील उतारा वाचून त्यावर आधारित ११ ते १५ प्रश्नांची उत्तरे द्या.**

वसंतातली 'नवी पालवी' कधी येते यातंही गणित हवामानावर अवलंबून असत. हवामान हे पृथ्वीच्या सूर्याभोवती फिरण्याच्या कक्षेच्या संदर्भात, तिच्या अक्षाच्या २३.५ अंशांतून कलण्यामुळे बरंचसं अवलंबून असतं. या कलण्यामुळे पृथ्वीकडून सूर्वाकडून येणारी उर्जा कमी – अधिक प्रमाणात मिळत असल्यानं ते होतं, पृथ्वीच्या या साडेतेवीस अंशांतून कलण्यांन ऋतुंची निर्मिती होते, हे मात्र मनावर कायमचे विलवलं होतं – विवलेलं आहे. सूर्याच्या प्रकाश आणि उष्णता काही काळ उत्तर गोलार्धात जास्त काळ (आपल्याकडे जेव्हा दिवस मोठा, रात्र छोटी असते), तर दुसऱ्या म्हणजे दक्षिण गोलार्धात काही काळ जास्त (आपल्याकडं जेव्हा दिवस लहान आणि रात्र मोठी असते.) असं होण्यानं ऋतुंची निर्मिती होते. खरें ऋतू दोनच. उन्हाळा आणि हिवाळा. आपण पावसाळयाला तिसरा ऋतू मानून टाकला आहे पण ते योग्य नाही. भारतीय (शक) कालगणनेमध्ये बारा महिन्यांतल्या प्रत्येक दोन महिन्यांचा एक ऋतू मानला आहे. चैत्र–वैषाखः वसंत, जेष्ठ – आषाढ, ग्रीष्म, श्रावण–भाद्रपदः वर्षा, अश्विन – कार्तिक शरद, मार्गशीष– दौष हेमंत ऋतू आणि माघ– फाल्गुन शिशिर ऋतू वर्षाची चैत्राची सुरूवात ज्या गुढीपाडव्याने करावची तो दिवस खरं तर वसंतसंपाताचा दिवस असायला पाहिजे. म्हणजे त्या दिवशी रात्र आणि दिन या दोन्हीच्या कालावधीत समानता पाहिजे. सुमारे दोन हजार वर्षापूर्वी हे होतही होतं. ज्या वेळा पृथ्वीचा अक्ष सूर्यासोबत बरोबर समांतर असेल, त्या वेळी असं होत. असं वर्षातून दोन वेळा आताही होतं. एकदा २१ मार्चला तर एकदा २२ सप्टेंबरला, या दोनही वेळी दिवस–रात्र बारा–बारा तासांची असते; पण पृथ्वी काही कालगणनेप्रमाणे फिरत नाही, तर तिच्या अवकाशातल्या फिरण्यावरून आपण कालगणना करायचे ठरवलं आहे. तशी सुधारणा आपण भारतीयांना केलीही आहे. मेघनाद साहांच्या अध्यक्षतेखाली एका समितीनं अशी 'भारतीय राष्ट्रीय सौर दिनदर्शिका' तयार केलेली आहे. ती खरं तर आपण सर्वांनी वापरात आणली पाहिजे. जुनं सोडून देऊन विज्ञानाधिष्ठित असलेली ही कालगणना वापरली पाहिजे. आकाशवाणी आणि दूरदर्शनवरून दर वेळी या कालगणनेप्रमाणे आजचा दिवस कोणता, ते नहेमी सांगितलं जातं; पण आपणच ती वापरात आणत नाही. असो तर मी सांगत होतो, की वसंतात वृक्षांना नवी पालवी फुटते, हे सर्वमान्य आहे. शिशिरातली पानगळ संपून गेल्यावर हे होतं, त्यानंतर नवा बहर येतो .... वगेरे.

१५ मार्चलाच वसंतातली पहिली पालवी अमेरिकेतल्या उत्तर आणि मध्यभागातल्या आडव्या पट्टयात अवतरल्याचं निरीक्षण अमेरिकेतल्या 'क्लायगेट सेंट्रल' या संस्थेने प्रसिद्ध केलं आहे. तसेच कॅलिफोर्निया विभागात पावसाचं प्रमाण गेल्या दहा वर्षापेक्षा छान झाल्याचाही आढावा आहे. नद्या–नाले वाहू लागले. पाण्याचं दुर्भिक्ष संपल्यानं जनतेला दिलासा मिळाल्याचं काहींनी लिहिल आहे, दर काहींनी जुन्या म्हणींचा आधार घेत 'एप्रिल ने ब्रिंग्ज फ्लॉवर्स इन पे' वगैरेही आनंदात लिहिलं आहे आजही इथ पाऊस पडतोय .... नोव्हेंबरपासून चालू झालेला पाऊस अजून चालूच आहे ! कंटाळा आलाय पावसाचा आणि त्यात झाडं मात्र नवीन पालवीनं बहरली आहेत .... दिसायला सारं प्रसन्न, छान वाटत आहे; पण हेच तर काळजीचं कारण आहे. कारण पालवीसोबतच फलं फलण्याचेही दिवस आधी येतील, असं आता जाणवत आहे. कारण काही ठिकाणी कळया धरणं, मोहोर येणं सुरूही झालं आहे. या अवकाळी पावसानं हा येणार 'बहर' ओला होणार, काळा पडणार .... कुसून, नासून जाणार .... कारण फुलं फुलली तरी त्यांच्यातून फलधारणर होण्यासाठी निसर्गात हे काम करणारे भुंगे, किंडे, माशा, फुलपाखरं मात्र अजून कोणातच असणार किंवा तीही पावसानं वाहून गेली असणार ! त्यामुळे, या ऋतुंच्या चक्रावर आधारित असणारं प्रत्येक झाड–झुडूप काही प्रमाणात त्यांच्या पुनरूत्पादन चक्रापासून वंचित राहणार ... यांचा दूरगामी परिणाम फारच वाईट होऊ शकतो .... पण हे असं का झालं याकडं नीट विचार करून द्यायला हवं आहे.

११. लेखकाच्या मते, कोणत्या प्रकारे उन्हाळा आणि हिवाळा यांची निर्मिती होते ?

अ. सूर्याची उष्णता आणि प्रकाश पूर्णतः जास्त दक्षिण गोलार्धात आणि काही काळ उत्तर गोलार्धात असल्याने.

ब. सूर्याची उष्णता आणि प्रकाश काही काळा दक्षिण गोलार्धात जास्त काळ तर दुसऱ्या उत्तर गोलार्धात काही काळ कमी.

क. सूर्याची उष्णता आणि प्रकाश काही काळ उत्तर गोलार्धात जास्त काळ तसेच, दक्षिण गोलार्धात काही काळ जास्त असल्याने,

ड. सूर्याची प्रकाश आणि उष्णता दोन्ही गोलार्धावर कमी, जास्त होत असल्याने

(१) फक्त अ (२) फक्त ब (३) फक्त क (४) फक्त ड

---

१२. लेखकाच्या मते, आपण पृथ्वीच्या बदलत्या वागण्याप्रमाणे मुख्यतः कोणती सुधारणा करावयास हवी?

अ. पारंपारिक कालगणनेचा वापर आणि आधुनिकतेचा अस्वीकार करावयास पाहिजे.

ब. पारंपरिक कालगणना सोडून देऊन आधुनिकतेशी जोडली गेलेली विज्ञानावर आधारित असलेल्या कालगणनेचा वापर केला पाहिजे.

(१) फक्त अ (२) फक्त ब (३) दोन्ही अ आणि ब (४) यापैकी दोन्ही नाही

---

१३. काहींच्या मते, जनतेला दिलासा मिळण्याचे महत्वाचे कारण कोणते ?

अ. यावर्षी पाऊस जास्त झाल्याने

ब पूर्वीच्या पडणाऱ्या पावसाच्या तुलनेत यंदा अधिक प्रमाणात पाऊस पडल्याने.

क. पावसाच्या अति प्रमाणाने नद्या दुथडी भरून वाहू लागल्यामुळे.

ड. जास्त पावसामुळे जनता खूप आनंदी असल्याने.

(१) फक्त अ आणि ब (२) क आणि ड (३) वरील सर्व (४) वरीलपैकी एकही नाही

---

१४. चिंता करण्यास कोणती बाब कारक असू शकते ?

अ. एकसारखा चालू असलेला पाऊस त्यामुळे फुललेल्या पालवी आणि अतिशय कमी प्रमाणात अंकुरलेली ती फुले.

ब. जास्त पडणारा पाऊस त्यामुळे, फुलेलेल्या पालवीसोबत फुले फुलण्याचा कालावधी लवकर येईल.

क. फुले लवकर फलल्याने, होणाऱ्या फलधारणेचा कालावधी लवकर येईल.

ड. ऋतुच्या चक्रावर अवलंबून असणारी झाडे उत्पादन करण्याच्या चक्रापासून वंचित राहणार असल्याने.

(१) अ आणि ब (२) ब आणि क (३) अ आणि ड (४) ब आणि ड

---

१५. लेखकाच्या मते, काणेती गोष्ट सर्वमान्य आहे ?

अ. पावसाच्या दिवसात वृक्षांना फुललेली पालवी बहरणे. ब. वसंत ऋतूत फुटणारी वृक्षांना नवी पालवी.

क. हेमंत ऋतुतील होणारी ती वृक्षांच्या पानांची गळ. ड. पावसाळयात बहरलेली ती झाडांवरची फुले.

(१) ब (२) क (३) अ (४) ड

---

**पुढील उतारा वाचून त्यावर आधारित १६ ते २० प्रश्नांची उत्तरे द्या.**

अर्थशास्त्र हे अर्थव्यवस्थेचा अभ्यास आणि त्यावरच्या परिणामाशी संबंधित आहे. राजकारण हे लोकांवर सत्तेच्या वापराने परिणाम करणारा सिद्धान्त आणि त्याचा वापर आहे उदाहरणार्थ, शासन, निवडणुका आणि राजकीय पक्ष.

सिद्धांतांच्या दृष्टीने पाहिजे असता अर्थशास्त्र हे अ–राजकीय असू शकते. राष्ट्राची आर्थिक कामगिरी कशा पद्धतीने सुधरावायला हवी याबद्दल तटस्थ, नि:पक्ष माहिती आणि शिफारशी देतांना आदर्श अर्थतज्ञाने कोणतीही राजकीय बाजू दुर्लक्षित केली पाहिजे किंवा कोणताही पूर्वग्रह टाळला पाहिले. या आर्थिक माहितीचा वापर करून मग निर्वाचित राजकारणी निर्णय घेऊ शकतात.

परंतु प्रत्यक्षात मात्र अर्थशास्त्र आणि राजकारण यांच्यामध्ये अत्यंत घनिष्ठ संबंध दिसून येतात कारण अर्थव्यवस्थेची कामगिरी हा राजकीय पाश्वभूमीमागील कळीचा मुद्दा आहे. अनेक आर्थिक मुद्दे हे राजकीयच असतात कारण त्यांच्याबाबतीत अनेक मतमतांतरे असतात.

अनेक आर्थिक मुद्दे राजकीय मतांच्या दृष्टिकोनातून पाहिले जातात. उदाहरणार्थ, काही लोक स्वभावत:च शासनाच्या हस्तक्षेपाविषयी साशक असतात. त्यामुळे ते अशा आर्थिक धोरणांना अधिक प्राधान्य देतात जी शासकीय हस्तक्षेपाला कमी करण्याकरिता येतात. उदाहरणार्थ, पुरवठा अर्थशास्त्र जे न–नियमन, खासगीकरण आणि कर–कपात यावर भर देते.

दुसऱ्या बाजूला हेही आहे की, अर्थतज्ञांना कदाचित समाजात मोठया प्रमाणावर समता येण्याकरिताच्या बाबींना प्राधान्य द्यावेसे वाटत असेल आणि कदाचित त्यासाठी शासनाने हस्तक्षेप करावा म्हणून शासनाला प्रोत्साहित करण्याची त्यांची इच्छाही असू शकते.

जर तुम्ही श्रीमंतांच्या आयकरात कपात करण्यासाठी वेगवेगळया अर्थतज्ञांना अहवाल द्यायला लावला तर त्यांच्या राजकीय आवडीनिवडीचे प्रतिबिंब त्यांच्या धोरणात्मक अहवालामध्ये पडण्याची शक्तता अधिक आहे. तुम्हाला कायम करकपातीच्या फायद्यांना पाठिंबा देण्यासाठी पुरावा मिळू शकतो, त्याचप्रमाणे अधिक कराच्या फायद्यांना पाठिंबा देण्यासाठीदेखील तुम्हाला कायम पुरावा मिळू शकतो.

काही अर्थतज्ञ मात्र चतुरपणे तटस्थ राहू शकतात आणि कुठल्याही राजकीय बाजूकडे झुकत नाहीत (जरी मी काही अशा अनेकांना भेटलेलो नाही.) ते कदाचित असा शोधनिबंध प्रकाशित करू शकतात जो त्यांच्या त्याआधीच्या दृष्टीकोनाला आव्हान देईल. त्यांच्या आवडीनिवडी काहीही असल्या तरी त्यांना रेल्वेचे खाजगीकरण करण्याचे कारण वाटणार नाही, किंवा कदाचित त्यांना हेही सापडू शकेल की करकपातीमुळे खरोखरच आर्थिक कल्याणात वाढ होईल.

१६. आदर्श अर्थतज्ञाजवळ पुढीलपैकी काणेती वेशिष्टये असावीत ?

अ. त्याला त्याच्या आयुष्यात राजकीय मत असायला नको.

ब. त्याला अर्थशास्त्राचे उच्चतम ज्ञान असावे

क. अर्थव्यवस्थेच्या सुधारणेशी संबंधित त्याची मते राजकीयदृष्टया तटस्थ असावीत.

(१) अ आणि क (२) ब आणि क (३) फक्त क (४) वरील सर्व अ,ब आणि क

---

www.spandancareers.org

१७. काही लोक आर्थिक धोरणांना का प्राधान्य देतात ?

अ. कारण त्यांचा शासन या यंत्रणेवर विश्वास नसतो

ब. कारण शासनातील अनेकजण निरक्षर असल्याने त्यांचा शासनावर विश्वास नसतो.

(१) फक्त अ (२) फक्त ब (३) दोन्ही अ आणि ब (४) दोन्ही नाही

---

१८. वेगवेगळया अर्थतज्ञांना कायम त्यांच्या मताच्या पुष्टीसाठी पुरावा सापडतो. यांचे कारण काय आहे ?

(१) कारण त्यांचा पुरावा सत्य बाबींवर आधारित असतो.

(२) कारण त्यांची अभ्यास करण्याची क्षमता अधिक असतो.

(३) कारण त्यांना अर्थव्यवस्थेबाबत अहवाल सादर करायचा असतो.

(४) यापैकी नाही.

---

१९. वरील उताऱ्याच्या लेखकाच्या मते कर—कपातीमुळे काय होईल?

(१) त्यामुळे आर्थिक कल्याणात घट होईल

(२) त्यामुळे आर्थिक कल्याण होईल.

(३) दोन्ही १ आणि २

(४) यापैकी नाही

---

२०. जेव्हा राजकीयदृष्टया तटस्थ असलेला अर्थतज्ञ रेल्वे खाजगीकरण नको असे म्हणतो, ते म्हणत असतांना त्याची खरी निवड काय असू शकते?

(१) कदाचित त्याला रेल्वेचे खाजगीकरण हवे असेल

(२) त्याला खरोखरच रेल्वेचे खाजगीकरण नको आहे.

(३) १ आणि २ दोन्ही

(४) सांगता येणार नाही

---

**पुढील उतारा वाचून त्यावर आधारित २१ ते २५ प्रश्नांची उत्तरे द्या.**

या उन्हाळयात शिमला या हिमालयीन शहरात पाण्याचे अक्षरशः अत्यंत दुर्भिक्ष्य जाणवले, परंतु या समस्येला सामारे जाणारे हे काही एकमेव शहरी नाही. नीति आयोगाच्या संयुक्त जल निर्देशांक, २०१८ नुसार, ६०० दशलक्ष लोक—जवळपास अर्धे भारतीय लोक आत्यंतिक पाणी टंचाईचा सामना करतात; आणि वाईट म्हणजे उपलब्ध असलेल्या पाण्याचा ७०% भाग हा दूषित आहे. आणि सन २०२० पर्यंत दिल्ली, बंगळुर, चेन्नई आणि हैदराबाद यांचा भूजलसाठा नाहीसा होईल आणि सन २०३० पर्यंत, जवळपास ४०% भारतीय जनतेला पिण्याचे पाणी उपलब्ध नसेल.

तथापि हे भविष्य आपण बदलू शकतो. पाणी हा पुनर्निर्मितीक्षम स्त्रोत आहे — तो पाऊस आणि बर्फ यांच्या रूपात दर वर्षी येतो. याहून महत्वाचे म्हणजे कृषिक्षेत्र वगळता आपण पाण्याचा पूर्ण वापर इतर कुठेही करत नाही. आपण पाणी वापरतो आणि ते पुन्हा सोडून देतो. त्यामुळेच त्याच्यावर प्रक्रिया करता येऊ शकते, त्याचा पुनर्वापर करता येऊ शकतो. आणि त्याचे पुनर्नवीकरण करता येऊ शकते. इथे मुद्दादेखील स्पष्ट आहे: प्रथम पाण्याचा प्रत्येक थेंब गोळा करून उपलब्ध पाण्याचा साठा वाढवणे आणि हे सगळीकडे. भारतासारख्या लहरी हवामानाच्या प्रदेशात, जिथे पर्जन्य टोकाचे आणि वेगवेगळया प्रमाणात होते, याचा अर्थ पावसाचे पाणी साठवण्यासाठी आणि भूजलपातळीचे पुनर्भरण करण्यासाठी अधिकचे काही करावे लागेल.

दूसरा आणि सर्वात महत्वाचा मुद्या म्हणजे कार्यक्षमता आणि जलवृद्धी या दोन बाबींना जोडून घेणे होय. प्रत्येक थेंबाने जास्तीचे पीक आणलेच पाहिजे आणि त्याचबरोबर जास्तीत जास्त सर्वच काही आणले पाहिजे. याचा अर्थ पाण्याचा वापर कमी करण्यासाठी जाणीवपूर्वक आखणी करणे होय. आता कृषि क्षेत्रात या आखणीचा अर्थ काय तर पीक पद्धत बदलणे म्हणजेच, जास्त पाणी लागणाऱ्या भात, गहू, आणि ऊस. यांसारख्या पिकांचे उत्पादन घेणे पाणी टंचाई असणाऱ्या भागात बंद करणे होय. याचाच अर्थ विविध पीके घेण्याकरिता शेतकऱ्यांना प्रोत्साहित करण्यासाठी धोरणांची पुनर्आखणी करणे, खाण्यापिण्याच्या अशा सवयींचा प्रसार करणे ज्यात पाण्याचा योग्य वापर करणाऱ्यां पीकांना प्राधान्य दिले जाईल.

जर पाण्याचा कार्यक्षम वापर हा कृषिक्षेत्राचा मुद्दा असेल तर, पाण्याचा पुनर्वापर हा शहरे आणि उद्योग यांच्यासाठीचा मुद्दा असायलाच पाहिजे. लक्षात द्या, शहरी/उद्योग क्षेत्रात किती पाणी सद्ध्या वापरले जाते याविषयीची अभ्यासपूर्ण माहिती आपल्याकडे उपलब्ध नाही. शेवटचं मोजमाप झालं होतं ते सन १९९० च्या दशकाच्या मध्यात, ज्यात कृषिक्षेत्र हे उपलब्ध पाण्याच्या ७५ ते ८०% इतका वापर करते असे म्हटले गेले होते. आज ही माहिती पूर्णपणे कालबाहय झालेली आहे. जसजशी शहरं वाढत जातील

www.spandancareers.org

तसतशी त्यांची पाण्याची गरज वाढत जाईल. हे पाणी दूरवरून फार दूरदूर अंतरावरून आणले जाईल, ज्यांमुळे खर्चात तर वाढ होतेच पण त्याचबरोबर वाहतुकीदरम्यान गळती होऊन तोटाही होतो.

**२१.** वरील उताऱ्यावरून खालीलपैकी कोणते निष्कर्ष काढता येतील ?

अ. पाणी वाया घालविण्याच्या बाबतीत आपण भारतीय असंवेदनशील आहेत.

ब. भारतातील पाणी प्रश्नाच्या सोडवणुकीसाठीचा एकमेव उपाय म्हणजे पाण्याचा पुनर्वापर ही पद्धत होय.

क. पाण्याचा पुनर्वापर ही पद्धत कदाचित कृषि क्षेत्रातकरिता फारसा उपयुक्त ठरणारा उपाय नाही.

(१) फक्त क (२) अ आणि क (३) ब आणि क (४) वरील सर्व अ,ब आणि क

---

**२२.** कमी पाणी वापरण्यासाठी खालीलपैकी कोणकोणते उपाय योजले पाहिजेत ?

अ. पीक पद्धत बदलणे

ब. सर्व पीकांचे उत्पादन वाढवणे

क. खाण्यापिण्याच्या अशा सवयींचा प्रसार करणे ज्यात भात आणि डाळ यांवर भर दिला जाईल

(१) फक्त अ (२) अ आणि क (३) अ आणि ब (४) अ, ब आणि क

---

**२३.** मोजमापनाच्या आधारे आज कृषि क्षेत्र पाण्याचा किती भाग वापरते आहे ?

(१) ७५—८०% (२) ७०—७५% (३) ७०—८०% (४) वरीलपैकी एकही नाही.

---

**२४.** पुढीलपैकी कोणते भविष्य आपण बदलू शकतो ?

अ. भारतीय जनतेपैकी अर्ध्या जनतेला पिण्याचे पाणी उपलब्ध नसेल.

ब. लोक पाण्याविना मृत्यूमुखी पडतील.

क. सन २०३० पर्यंन्त चेन्नई आणि मुंबई या शहरांचा भूजलसाठा संपलेला असेल

ड. हिमालयीन शहर शिमला अस्तित्वातच राहणार नाही

(१) अ, ब, क (२) फक्त ब (३) ब, क (४) वरीलपैकी एकही नाही.

---

**२५.** वरील उताऱ्याच्या आधारे योग्य विधान निवडा.

(१) जर शहर छोटी झाली तर त्यांना पाण्याची गरज भासणार नाही.

(२) जर शहर वाढली नाहीत तर त्यांना पाण्याची गरज भासणार नाही

(३) जर शहरं वाढली तर त्यांना पाण्याची गरज भासेल

(४) वरील सर्व १, २, ३

---

**पुढील उतारा वाचून त्यावर आधारित २६ ते ३० प्रश्नांची उत्तरे द्या.**

ईश्वर ही संपल्पना धर्मासोबत नेमकी कधी आणि कशी एकरूप झाली हे सांगता येणे शक्य नाही. कदाचित ईश्वर यासंकल्पनेचे मूळ समाजातील महापुरूषाप्रति असलेल्या पूजनीयतेमध्ये असेल — एक असा नायक — जो ईश्वरवादाला जन्म देतो — ज्यात या जिवंत ईश्वरावर श्रद्धा आहे. हे जीवन कोणी निर्माण केले या प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी केलेल्या विशुद्ध दार्शनिक अनुमानाचा परिपाक म्हणून कदाचित ईश्वर ही संकल्पना अस्तित्वात आलेली असू शकेल. ज्यातून देवतावादाचा उदय झाला—ज्यात विश्वाचा रचिता म्हणून ईश्वरावर विश्वास दाखवला गेला. काहीही असेले तरी ईश्वर ही संकल्पना धर्माचा अविभाज्य भाग नाही. तिने धर्मात कसा शिरकाव केला याचे स्पष्टीकरण देणे कठीण आहे. धर्म आणि नीतीमत्ता यांच्या एकमेकांशी असलेल्या संबंधाबाबत किमान एवढे तरी सावधपणे सांगता येतेच. जरी धर्म आणि ईश्वर यांच्यातील नाते अविभाज्य असे नसले तरी धर्म आणि नीतीमत्तेमधील नाते मात्र अविभाज्य आहे. धर्म आणि नीतीमत्ता या दोन्ही बाबी मानवी अस्तित्वाच्या म्हणजेच — जीवन, मृत्यू, जन्म आणि विवाह याच मूलभूत तथ्यांशी जोडल्या गेल्या आहेत. धर्म या जीवनप्रक्रियांना अभिषिक्त करण्याच्या प्रक्रियेत धर्म, समाजाने स्वत:चे जतन करण्याकरिता तयार केलेल्या नियमांना देखील अभिषिक्त करून गेला. आता या दृष्टीने पाहिले असता धर्म आणि नीतीमत्ता यांच्यातील बंध का निर्माण झाला असावा हे सहज स्पष्ट होते. धर्म आणि ईश्वर यांच्यामधील नात्यापेक्षा हा बंध अधिक जवळीकीचा आणि अधिक नैसर्गिक होता. परंतु धर्म आणि नीतीमत्तेमधील हे सम्मीलन नेमके कधी झाले हे सांगणे सोपे नाही.

ते कसेही असले तरीही, नागर समाजाचा धर्म हा रानटी समाजाच्या धर्माहून दोन महत्वपूर्ण महत्वपूर्ण वैशिष्टयांच्या बाबत वेगळा ठरतो हे तथ्य शिल्लक राहतेच. नागर समाजात ईश्वर हा धर्माचा भाग म्हणून येतो. नागर समाजात नीतीमत्ता धर्माद्वारे पावित्र्य प्राप्त करते.



www.spandancareers.org

मी ज्या धार्मिक क्रांतिविषयी बोलतो आहे त्याची ही प्रथम अवस्था होय. धर्माच्या उभारणीमध्ये या दोन नवीन वैशिष्टयांच्या उदयाबरोबर ही धार्मिक क्रांती संपते असे मानण्याचे कारण नाही.

**२६.** धर्म आणि नीतीमत्ता यांमध्ये बंध का निर्माण झाला ?

अ) समाज आणि ईश्वर या दोघांमधील नात्यासाठी धर्म ही सर्वात अधिक गरजेची बाब होती.

ब) समाजाच्या अस्तित्वासाठी आवश्यक असणाऱ्या नियमांना धर्माकडून मान्यता मिळाली.

क) धर्म आणि नीतीमत्ता दोन्ही बाबी आयुष्य अधिक चांगले करतात.

(१) फक्त ब (२) अ आणि ब (३) ब आणि क (४) अ, ब आणि क

---

**२७.** वरील उताऱ्यावरून खालीलपैकी कोणते निष्कर्ष काढता येऊ कशतात?

अ) रानटी समाजात ईश्वर हा कदाचित धर्माचा भाग नसावा.

ब) नागर समाज हा रानटी समाजापेक्षा अधिक भ्रष्ट आहे.

क) ईश्वर ही संकल्पना धर्माचा अविभाज्य भाग कशी झाली याचा शोध कुणीच घेऊ शकत नाही

(१) फक्त अ (२) अ आणि क (३) फक्त क (४) वरील सर्व अ,ब आणि क

---

**२८.** ईश्वर या संकल्पनेच्या उगमाची शक्यता असणारे स्त्रोत म्हणजे.....

अ. जीवनाच्या निर्मितीमागचे सत्य जाणून घेण्यासाठी मनुष्याने घेतलेला शोध

ब. पाश्चिमात्य जगात झालेल्या दार्शनिक घडामोडी

क. जिवंत असलेल्या महान व्यक्तिंप्रतिचा भक्तीभाव

(१) फक्त क (२) अ आणि क (३) ब आणि क (४) वरील सर्व अ, ब आणि क

---

**२९.** जन्म आणि मृत्यू यांना जतन करण्याकरिता नियमावली कोण निर्माण करते ?

(१) धर्म (२) ईश्वर (३) समाज (४) नीतीमत्ता

---

**३०.** खालीलपैकी कोणत्या घडामोडी या धार्मिक क्रांतीचा भाग झाल्या ?

अ. धर्माला नीतीमत्तेकडून पावित्र्या प्राप्त होणे

ब. ईश्वर हा धर्माचा भाग म्हणून आधुनिक समाजात पाहिला जाणे.

(१) फक्त अ (२) फक्त ब (३) दोन्ही अ आणि ब (४) दोन्ही नाही.

---

**पुढील उतारा वाचून त्यावर आधारित ३१ ते ३५ प्रश्नांची उत्तरे द्या.**

जी राष्ट्र आपला समाज ज्ञानाच्या आधारावर विकसित करतील तीच राष्ट्रं नव्या शतकात तग धरू शकतील, पुढं जाऊ शकतील. इतर राष्ट्र काळाच्या ओघात कदाचित विस्मृतीत जातील, नष्ट होतील. पुरातनकाळी भारतीय समाज खरोखरच ज्ञानकेंद्रित समाजांमध्ये आघाडीवर होता, पण मध्ययुगीन काळात आपण आपला मार्ग हरवून बसलो. या नवीन ज्ञानाधारित शतकात प्रत्येक भारतीयानं ज्ञानोपासकच झालं पाहिजे. मग तो शेतकरी असो, ग्रामीण महिला असो, प्रसिद्धी माध्यमात काम करणारा असो किंवा एखादा बलुतेदार असो. प्रत्येकानं ज्ञान मिळवणं महत्वाचे आहे. सोप्या भाषेत सांगायचं तर आपण जे काही करतो ते नेमकं काय आणि का करतोय हे ज्याला पूर्णत: माहिती आहे तो खरा ज्ञानोपासक. जेव्हा शेतकऱ्याला तो ज्या जमिनीत बी पेरतोय त्या जमिनीची पूर्णत: माहिती असेल, त्या जमिनीतच तो का, केवढं, कधी, कसं, खत घालणार किंवा जंतुनाशकं, कधी, किती फवारणार याचा पूर्ण अभ्यास त्यानं केलेला असेल. तसेच जिथ त्याच्या सर्व शेतीच्या कामांच्या नियोजनासाठी हवामान अंदाजाचा आधार मिळेल. अशी माहिती देणाऱ्या पूरिपूर्ण खेडयात तो राहील. तेव्हा शेतकरीसुद्धा ज्ञानोपासक बनू शकेल. अशा प्रकारचे ज्ञानोपासक तयार करण्याच्या सृजनशील प्रयोगांना सुरूवात झालेली आहे. उदाहरणार्थ स्वामिनाथन् रिसर्च फाऊंडेशननं पाँडेचेरीजवळच्या खेडेगांवांमध्ये अशा तऱ्हेची नवीन पद्धती विकसित करण्याचा प्रयत्न सुरू केलेला आहे. या ठिकाणी ग्रामीण जनतेला पर्यावरणपूरक शेती करण्यासाठी तसेच आर्थिक बाजारपेठ आणि त्यातील चढउतारांचा उपयोग करण्यासाठी अद्ययावत माहिती देण्यात येते. शेतकऱ्यांना त्यांच्या शेतीतील मातीचे आरोग्य कार्ड तयार करण्याचा प्रशिक्षण देण्यात येतं या तऱ्हेने ग्रामीण शेतकऱ्याला तंत्रज्ञानाच्या युगात सन्मानानं जगायला अशा प्रकारचं प्रशिक्षण मदत करेल. अशाच प्रयत्नांचा गुणाकार संपूर्ण भारतात होण्याची गरज आहे. भारतीय ग्राहकसुद्धा ज्ञानाची उपासना करणारा हवा तरच तो. बाजारपेठांचं गतिशास्त्र नाटयमय पद्धतीनं बदलू शकेल. एखाद्या उत्पादनातील संपूर्ण अंतर्बाहय माहिती त्या उत्पादनावर असायला हवी. उदाहरणार्थ, इकोलेबलिंग करण्याचा आग्रह धरणं म्हणजे दुसरं तिसरं काहीही नसून ग्राहकाला खरेदी करत असलेल्या आणि वापरणार असलेल्या उत्पादनामुळे पर्यावरणावर काय बरा–वाईट परिणाम होणार आहे याचा इत्थंभूत माहिती देणं होय. अशा तऱ्हेरे आपला समाज ज्ञानोपासक समाज असेल, नागरिक जागरूक

असतील तर पर्यावरणाचा विध्वंस करणारे उद्योगधंदे ते बंद पाडतील. आर्थिक विकासाला हातभार लावणारे उद्योग नक्कीच बंद पडणार नाहीत. ज्ञान हे केवळ विकासाचं साधन नाही ते विकासाचं दुसरं रूपच आहे. भविष्यकाळात खरा ज्ञानाधिष्ठित समाजच आधुनिक माहिती—तंत्रज्ञानाचा कल्पक वापर करून शकेल. गेल्या वीस वर्षात माहिती—तंत्रज्ञान, विज्ञान यांच्यात द्रुतगतीने बदल झालेले आहेत. यापुढेही त्याहून अधिक वेगानं बदल होतील. याचाच अर्थ भारतासाठी ही आनंदाची गोष्ट आहे. पण केवळ माहिती असून चालणार नाही तर त्यात गती असणंही आवश्यक आहे. सतत चौकस राहिलं तरच माहितीचा आपण चांगला वापर करू शकू. म्हणूनच आपल्याला चौकस समाज निर्माण करायचा आहे. जर असा चौकस समाज निर्माण झाला तरच या नवज्ञानाच्या क्रांतीमुळे सामाजिक, लैंगिक आणि आर्थिक समता येऊ शकेल. आत्तापर्यंत आपण अनेक घोषणा दिल्या. उदा. सर्वांना अन्न, सर्वांना आरोग्य वगैरे, त्याचप्रमाणे या नवीन ज्ञानाच्या शतकात आपल्याला 'सर्वांनां ज्ञान' अशी घोषणा करता येईल का ? सकृतदर्शनी तरी हे अवघड वाटतं ना । जोपर्यंत आपण आय.टी. कडे वळत नाही तोपर्यंतच हे अवघड वाटेल. गेल्या १० वर्षांमध्ये ज्ञानाचा आवाका दुपटीने वाढला आहे. इतकंच नाही तर त्यातील गुंतागुतही दररोज वाढते आहे. त्यामुळे सध्याच्या काळात आपलं ज्ञान सतत घासून पुसून लख्ख करणे ही पूर्वी कधी नव्हती एवढी गरज झाली आहे. म्हणूनच आधुनिक माहिती तंत्रज्ञानाच्या साहाय्यानं सातत्याने ज्ञान मिळवत राहण्याचा प्रक्रिया कायम ठेवली पाहिजे. भविष्यकाळात या आधारावर ज्ञान मिळवू शकणारे आणि ज्ञान मिळवण्याची क्षमता नसणारे यांच्यामध्ये एक मोठी दरी (डिजिटल डिव्हाईड) निर्माण होण्याची शक्यता आहे.

**३१.** ग्रामीण शेतकऱ्याला सन्मानाने जगण्यास आय.टी. युगात कोणती गोष्ट मदत करेल असे उताऱ्यातून दिसते ?

(१) शेतकऱ्याचे स्वत: ज्ञानोपासक बनणे.
(२) शेतकऱ्यास बाजारपेठेची माहिती मिळाल्यामुळे.
(३) शेतकऱ्याने मातीचे परीक्षण केल्यास.
(४) शेतकऱ्यास शेतीविषयक विविध बाबींचे प्रशिक्षण दिल्याने

---

**३२.** लेखकास 'सर्वांना ज्ञान' ही घोषणा देणे अवघड का वाटते ?

अ. भारताची लोकसंख्या जास्त असल्यामुळे.
ब. आजपर्यंतच्या अशा प्रकारच्या उपक्रमांना यश न आल्याने
क. मुळातच साक्षरतेचे प्रमाण अत्यल्प असल्याने.
ड. मोठा डिजिटल डिव्हाईड असल्यामुळे.

(१) अ,क,ड  (२) ब, ड  (३) अ, ब, क  (४) फक्त ब

---

**३३.** ज्ञान हे केवळ विकासाचे साधन नाही ते विकासाचे दुसरे रूपच आहे, असे लेखक का म्हणतो ?

(१) ज्ञानामुळे आपणास पर्यावरणाची माहिती मिळेल.
(२) ज्ञानामुळे पर्यावरणाचे विध्वंस करणारे उद्योगधंदे बंद पडतील.
(३) ज्ञानामुळे विकासाला हातभार लावणारे उद्योगधंदे बंद पडणार नाही
(४) पर्याय २ व ३ योग्य

---

**३४.** खरा ज्ञानोपासक कोण असतो असे लेखकाचे मत आहे?

अ. शेतकरी, ग्रामीण महिला, प्रसिद्धी माध्यमात काम करणारा किंवा बलुतेदार.
ब. आपण जे काही करतो ते नेमके काय व का करतोय हे ज्याला माहीत असते तो.
क. पुरातन काळातील भारतीय समाज.
ड. मध्ययुगीन काळातील भारतीय समाज

(१) फक्त अ  (२) फक्त ब  (३) फक्त क  (४) फक्त ड

---

**३५.** सध्याच्या काळात आपली महत्वाची गरज कोणती निर्माण झाली आहे असे लेखक म्हणतो ?

अ. सतत चौकस राहणे.
ब. सर्वांपर्यंत ज्ञान पोहचवणे
क. मिळवलेले ज्ञान वापरून वाढवून सतत अद्ययावत करणे.
ड. माहिती तंत्रज्ञानाचा वापर करणे.

(१) फक्त अ, क  (२) ब, ड  (३) फक्त क  (४) अ, ब, क, ड

---

**पुढील उतारा वाचून त्यावर आधारित ३६ ते ४० प्रश्नांची उत्तरे द्या.**

आपल्या घरातील विद्युतधारा ही मुख्य विद्युतवाहक तारेतून, जमिनीखालून तारांद्वारे, किंवा विद्युत खांबावरील तारांमधून आणली जाते. त्यापैकी एक तार वीजयुक्त तर दुसरी तार तटस्थ असते. सामान्यपणे वीजयुक्त तार लाल रंगाच्या रोधी (म्हणजेच विसंवाहक) आवरणाची असते, तर तटस्थ तार काळया रंगाच्या रोधी आवरणाची असते. भारतात या दोन्ही तारांमधील विद्युत विभवांतर साधारणत: २२०V असते. या दोन्ही तारा घरातील विद्युत मीटरला मुख्य वितळतारेद्वारे जोडलेल्या असतात. मुख्य कळद्वारे या तारा घरातील सर्व वाहक तारांना जोडलया जातात. आपल्या घरामध्ये प्रत्येक खोलीमध्ये वीज उपलब्ध होईल अशा रीतीने वीजवाहक तारांची जोडणी केलेली असते. प्रत्येक स्वतंत्र परिपथामध्ये वीजयुक्त आणि तटस्थ तारेच्या दरम्यान वेगवेगळी उपकरणे जोडलेली असतात. प्रत्येक उपकरणाला समान विभवांतर पुरवले जाते आणि उपकरणे नेहमी समांतर जोडणीने जोडलेली असतात. या व्यतिरिक्त तिसरी तार भूसंपर्कन असून ती पिवळया रंगाच्या रोधी आवरणाची असते. ती घराजवळ जमिनीत एका धातुपट्टीला जोडलेली असते. ही तार सुरक्षेसाठी वापलेली असते.

विद्युत उपकरणाचे नुकसान न होऊ देण्यासाठी वितळतार वापरतात. ही तार विशिष्ट द्रवणांक असलेल्या संमिश्राची बनलेली असते व ती विद्युत उपकरणांना एकसर जोडणीत जोडेलेली असते. जर परिपथातून काही कारणाने ठराविक मर्यादेबाहेर विद्युतधारा जाऊ लागली, तर या तारेचे तापमान वाढूनं ती वितळते. त्यामुळे विद्युत परिपथ खंडित होऊन विद्युतप्रवाह थांबतो व उपकरणांचे संरक्षण होते, ही तार पार्सेलिनसारक्ष्या रोधक पदार्थापासून बनवलेल्या खोबणीत बसवलेली असते. घरगुती वापरासाठी 1A, 2A, 3,A, 4A, 5A व 10A मर्यादा असलेल्या वितळतारा वापरतात.

The electricity in our homes is brought through the main conducting cable either from the electric pole or from underground cables. Usually, there are three wires in the cable. One is called the live wire which brings in the current. It has red insulation. The other wire is called neutral wire through which the current returns. It is black. In India, the voltage difference between the live and neutral wires is about 220V. both of these wires are connected to the electric meter through a fuse. Through the main switch, they are connected to all the conducting wires inside the home so as to provide electricity to every room. In each separate circuit, various electrical appliances are connected between the live and neutral wires. The different appliances are connected in parallel and the potential difference across every appliance is the same. The third wire is called the earth wire and is of yellow or green colour. This is connected to a metal plate buried deep underground near the house and is for safety purposes.

Fuse wire is used to proted domestic appliances. It is made of mixture of substances and has a specific melting point. It is connected in series to the electric appliances. If for some reason, the currect in the circuit increases excessively, the fuse wire gets heated up and melts. The circuit gets broken and the flow of current stops, thus protecting the applicance. This wire si fitted in a groove in a body of porcelain – like non-conducting material. For domestic use, fuse wires with upper limits of 1A, 2A, 3A, 4A, 5A and 10A are used.

**३६.** काळया रंगाच्या रोधी आवरणाची वीजयुक्त तार .......... या स्वरूपाची असते.
(१) अस्थिर (२) स्थिर (३) विद्युतचुंबकिय (४) वरीलपैकी एकही नाही

The live wire having black insultion is that of ------- nature.
(1) unstable (2) stable (3) electromagnetic (4) none of the above

**३७.** वितळतार ही अशाी तार आहे की जी ...... बनलेली असते.
(१) उच्च द्रवणांक नसलेल्या संमिश्रणाची
(२) सामान्य द्रवणांक असलेल्या संमिश्रणाची
(३) ठरावीक द्रवणांक असलेल्या संमिश्रणाची
(४) वरीलपैकी एकही नाही

Fuse wire is such a wire which is made up of ------.
(1) a composite that doe not have a hight melting point
(2) a composite that has a normal melting point
(3) a composite that has a specific melting point
(4) none of the above

www.spandancareers.org

३८. विद्युत उपकरणांचे नुकसान न होऊ देणे हे कशावर अवलंबून आहे ?

अ. वितळतारेवर

ब. पोर्सेलिनसारख्या रोधक पदार्थावर

क. लाल रंगाच्या वीजयुक्त तारेवर

ड. भूसंपर्कन तारेवर

(१) अ, ब, वगळता सर्व (२) ब, क वगळता सर्व

(३) क, ड वगळता सर्व (४) ब, क, ड वगळता सर्व

Protection of the domestic applinces from damages is dependant on which of the following ?

A) Fuse Wire

B) Insulatory material like porcelain

C) Red coloured live wire

D) The earth wire

(1) All except A, B (2) All Except B, C (3) All except C, D (4) All except B, C, D

---

३९. प्रस्तुत दोन विधानांपैकी कोणते अयोग्य आहे ?

अ. समान विभवांतर पुरवलेली उपकरणे नेहमी असमान जोडणीने जोडलेली असतात.

ब. भूसंपर्कन तार ही विद्युतरोधक असते म्हणून जमिनीत धातुपट्टीला जोडलेली असते.

(१) फक्त अ (२) फक्त ब (३) दोन्हीही (४) दोन्हीही नाहीत

Which of the following two statements is/are incorrect ?

A) Appliances provided with same potential difference are always unevenly connected.

B) Earth wire is connected to a metal plate buried underground as it is electricity resistant.

(1) Only A (2) Only B (3) Both (4) None

---

४०. उताऱ्याची मध्यवर्ती संकल्पना कोणती ?

(१) विद्युत धारेमधील विभवांतराचे महत्त्व पटवून देणे.

(२) विद्युत उपकरणांसाठी वितळतारेचे महत्व सांगणे.

(३) घरातील विद्युत तारांचे कार्य आणि फरक उलगडणे.

(४) विद्युतधारेच्या आवश्यकतेचे महत्व सांगणे.

What is the central theme of the passage ?

(1) To stress the importance of the potential difference in electricity

(2) to convey the importance of the earth wire for the appliances.

(3) To explain the function and difference of the domestic electrical wires.

(4) To elaborate the importance of the necessity of electricity.

---

**पुढील उतारा वाचून त्यावर आधारित ४१ ते ४५ प्रश्नांची उत्तरे द्या.**

ग्रेट रिफ्ट व्हॅली ही मानवी संस्कृतीचे माहेरघर आहे. मानवशास्त्र अभ्यासणाऱ्या लीकी कुटुंबीयांना या व्हॅलीच्या पूर्व आफ्रिकेतील क्षेत्रात आपल्या मानवाच्या वंशजांच्या अस्थि सापडल्या होत्या. तेथे सापडलेल्या काही मानवी जिवाच्या अस्थी तीस लाख वर्षांएवढया पुरातन आहेत. शिकारी युगातून शेती युगाकडे झालेल्या मानवजातीच्या उत्क्रांतीचे आणि भाषा व लेखनकला यांच्या प्रारंभाचे पुरावे याच क्षेत्रात सापडतात. सुमारे दहा हजार वर्षांपूर्वी सध्याच्या मानवी संस्कृतीचा उगमही येथेच झाला. हा प्रदेश ज्यूडिश, ख्रिश्चन आणि इस्लाम धर्माचे जन्मस्थान आहे.

जमिनीची विविध रूपे, सरोवरांचे प्रकार, गरम पाण्याचे झरे, जॉर्डनमधील मृत समुद्र आणि केनियातील नकुरू सरोवर यासारखी विविध सरोवरे अशा मानववंशशास्त्राशी जवळचा संबंध असलेल्या महत्वाच्या ठिकाणांमुळे ग्रेट रिफ्ट व्हॅलीस जागतिक वारसा स्थळ म्हणून घोषित करण्यात आले अहोत. येथे पर्वत आणि खूप अधिक तीव्रतेची भूकंपी प्रक्रिया घडत असणारे सक्रिय ज्वालामुखी आहेत. रिफ्ट व्हॅली ही विशेषत: जैविक वैविध्यात खूप समृद्ध आहे. युरोप, आशिया आणि आफ्रिकेतील पक्ष्यांसाठी ती स्थलांतराचा मार्ग तसेच हिवाळयातील तळ उपलब्ध करून देते.

या ग्रेट रिफ्ट व्हॅलीतील देश आगामी दशकात हवामानातील बदलाने खूप जास्त प्रमाणात प्रभावित होतील असा अंदाज आहे. मोझांबिकमध्ये करण्यात आलेल्या हवामानाच्या नोंदीत दिसून आले आहे की, गेल्या चाळीस वर्षांत तेथील तापमान

१.१ ते १.६ अंश सेल्सिअसने वाढले आहे. या देशांच्या अंतर्भागाचे उच्चतम तापमान २०४० ते २०६० या अवधीत जवळ जवळ तीन अंश सेल्सिअसने वाढण्याची अपेक्षा आहे. याची परिणती अनपेक्षित पाऊस, दुष्काळ, पूर आणि अनियंत्रित आग अशा संकटांत होईल, रिफ्ट व्हॅलीत 'पाणी' हा आधीपासूनच राजकीय विवादचा मुद्दा बनला आहे आणि विशेषत: जॉर्डन आणि पॅलेस्टाईन ही तर जगात पाण्याचे सर्वात अधिक दुर्भिक्ष असलेली क्षेत्रे आहेत. हवामानातील वाढत्या दुष्परिणामांमुळे यापुढे काय परिस्थिती निर्माण होईल याचा विचारदेखील थरकाप उडविणारा आहे. पाण्याशी संबंधित तणाव हा इस्त्राईल आणि पॅलेस्टाईन, इस्त्राईल आणि जॉर्डन, जॉर्डन आणि सीरिया यांच्यातील परिस्थितीचा एक अविभाज्य घटक बनला आहे.

म्हणूनच, पाणी आणि हवामानातील बदल या समस्यांवर त्वरित पावले उचलली गेली नाहीत तर ज्या प्रदेशाने मानवी संस्कृतीच्या प्रारंभास जोपासले तेथेच मानवाचा अंत होण्यास सुरूवात होईल. किंबहुना केवळ मनुष्यच नव्हे तर इतर प्रजातींचा संहार होऊ शकेल. हळूहळू साऱ्या सृष्टीचे भवितव्य धोक्यात येण्याची शक्यता आहे.

**४१.** खालील विधानांचा विचार करा.

अ. ग्रेट रिफ्ट व्हॅलीतील देश हवामानातील बदलाने खूप जास्त प्रमाणात प्रभावित होत आहे.

ब. दहा हजार वर्षांपूर्वी भाषा लेखनकला मानवाला अवगत होती असे निश्चित सांगता येते.

(१) अ योग्य, ब अयोग्य

(२) अ अयोग्य, ब योग्य

(३) अ आणि ब योग्य

(४) अ आणि ब अयोग्य

---

**४२.** लेखकाच्या मते ग्रेट रिफ्ट व्हॅलीची विशेषत: कोणती आहे ?

(१) गरम पाण्याचे झरे

(२) अधिक तीव्रतेची भूकंप क्षेत्रे

(३) समृद्ध जैविक विविधता

(४) सक्रीय आणि मृत ज्वालामुखी

---

**४३.** जेथे मानवी संस्कृतीचा उगम झाला तेथेच मानवाचा अंत होण्यास सुरूवात होईल असे लेखकाला का वाटते ?

अ. हवामानातील बदल

ब. देशादेशातील युद्धे

क. पाण्याचा प्रश्न

ड. तापमानातील वाढ

(१) अ आणि ब (२) ब आणि क (३) अ आणि क (४) अ आणि ड

---

**४४.** लेखकाच्या मते ग्रेट रिफ्ट व्हॅलीस जागतिक वारसास्थळांच्या यादीत का स्थान देण्यात आले ?

अ. मृत समुद्र

ब. गरम पाण्याचे झरे

क. समृद्ध जैविक वैविध्य

ड. मानववंशशास्त्राशी संबंधीत असलेली स्थळे

(१) अ आणि ब (२) अ, ब, आणि ड (३) फक्त ड (४) वरीलपैकी सर्व

---

**४५.**खालील पर्यायांचा विचार करा.

अ. लेखकाच्या मते मानवी संस्कृतीच्या उगमाअगोदरच मानवी उत्क्रांती झाली.

ब. मानवी संस्कृती नंतरच उत्क्रांती उदयास आली.

क. बहुतांश प्रमुख धर्माचे उगमस्थान हे दक्षिण आफ्रिकेत आहे.

ड. भविष्यामध्ये तापमान वाढीमुळे ग्रेट रिफ्ट व्हॅलीतील पर्यावरण धोक्यात येण्याची शक्यता आहे.

(१) अ आणि क अयोग्य आहेत.

(२) ब आणि क अयोग्य आहेत.

(३) ब आणि ड योग्य आहेत.

(४) क आणि ड योग्य आहेत.

---

www.spandancareers.org

**पुढील उतारा वाचून त्यावर आधारित ४६ ते ५० प्रश्नांची उत्तरे द्या.**

भारत व चीन यांच्यात व्यापारी संबंध पूर्वापार चालत आले आहेत. बौद्ध धर्मामुळे देवाणघेवाण वाढत गेली. पहिल्या सहस्त्रकात भारतीय विद्यापीठात शिक्षण घेण्यासाठी चिनी विद्‌वान मोठया संख्येने येत असत. चिनी प्रवाशांनी तसेच विद्‌वानांनी भारतीय शिक्षण व आरोग्यव्यवस्थेला आदर्श म्हटले आहे. हा इतिहास रम्य वाटला तरी वर्तमानात भारतीय शिक्षण व आरोग्य क्षेत्रातील अवस्था दयनीय आहे. शिक्षणाचा प्रसार आणि उत्तम सार्वजनिक आरोग्य यांच्यामुळे जागतिकीकरणानंतर चीनला आंतरराष्ट्रीय व्यापारात हनुमान उडी घेता आली. निर्यात होणाऱ्या वस्तूंचे उत्पादन करण्याकरिता चीनमध्ये कामगारांना प्रशिक्षित केले जाते. जागतिक बाजारपेठेत उतरायचे असेल तर गुणवत्ती उच्च दर्जाची असावी लागते. अनुरूप शिक्षण व चांगले आरोग्य असल्यास उत्पादन व सेवा यांचा दर्जा टिकून राहतो. जागतिक बाजारपेठेत चीनने स्थान मिळवताच तेथे नोकऱ्या वाढू लागल्या. परंतु या विकासप्रक्रियेपासून भारताने बोध घेतला पाहिजे. राजकीय समानता आली तरी सामाजिक व आर्थिक विषमतेमध्ये भारतीय लोकशाही आयुष्य कंठणार आहे. १९५० साली डॉ. आंबेडकरांनी प्रजासत्ताकवर केलेले मार्मिक भाष्य आजदेखील तंतोतंत लागू पडते. १९४३ नंतर दुष्काळामुळे भूकबळी झाले नाहीत, यांचे श्रेय भारतीय लोकशाहीला आहे. गेल्या साठ वर्षांत आयुष्मान व दरडोई उत्पन्न वाढले, तरी देखील आपल्या अजून खूप मोठा पल्ला गाठायचा आहे. काही महानगरांमधील मोजक्या लोकांभोवती जागतिकीकरणाचा फायदा एकवटला आहे. 'विषम संधी हा आपल्या लोकशाहीवर लागलेला कलंक आहे. निरक्षरता, अनारोग्य, अपूर्ण जमीन सुधारणा व शेतीविकासाची अपेक्षा अशीच चालू राहिली तर अशांतता व असुरक्षिततेमुळे लोकशाही धोक्यात येऊ शकते. महाभयंकर हिंसा आणि पर्यावरण विनाश यामुळे सध्या जग अंधारून गेले आहे. तर्क वा युक्तीने संवाद साधता येण्याची क्षमता नसणारे निर्बुद्ध बळाच्या आधारे मते लादू पाहतात, असे लोक सर्व काळात, सर्व धर्म व पंथात असतात. लोकशाही व समाज स्वास्थ धोक्यात येण्याचे प्रसंग येत असतात. आज समस्त जनता हवालदिल झाली असून, हे भीषण वातावरण त्यांना नकोसे झाले आहे. विविध पद्धतीने जनता त्यांच्या भावना व्यक्त करीत आहे. आणि हीच आशा आहे. बदल व्हावा ही अभिव्यक्ती महत्वाची असते. त्यातूनच युक्तिवाद व वादसंवाद झडू लागतात. मोठया परिर्वनाची ती नांदी असते. काळयाकुट्ट ढगांनी दाटी केली तरी काही क्षणात रूपेरी कड अवतरते आणि आसमत उजळून जातो.

**४६.** खालील विधानांचा विचार करून योग्य विधानांचा पर्याय निवडा :

अ. १९४३ नंतर भारतात भूकबळी झाले नाहीत.

ब. भारतामध्ये जागतिकीकरणाचा फायदा हा तळागाळापर्यंत पोहचलेला दिसत नाही.

(१) फक्त अ बरोबर (२) फक्त ब बरोबर (३) दोन्ही बरोबर (४) दोन्ही चूक

---

**४७.** काळयाकुट्ट ढगांनी दाटी केली तरी काही क्षणात रूपेरी कड अवतरते आणि आसमंत उजळून जातो, असे वर्णन लेखक कशाविषयी करतो आहे ?

(१) लोकशाहीवर आलेल्या संकटाबद्दल.

(२) बळांचा वापर करून लोकांवर अन्याय करणाऱ्यांविरूद्ध जनतेमध्ये निर्माण होणाऱ्या भावनांचे.

(३) हिंसा व पर्यावरण विनाश यांमुळे जगात निर्माण झालेल्या अंधाराचे.

(४) समाजावर येणाऱ्या संकटांना लोकांनी विविध मार्गांनी परतवून झालेल्या समाजपरिर्वतनाचे.

---

**४८.** चीनला आंतरराष्ट्रीय व्यापारात दैदिप्यमान प्रगती करणे कशामुळे शक्य झाले ?

अ. शिक्षणाच्या प्रसारामुळे

ब. कामगारांना प्रशिक्षित केल्यामुळे

क. चांगल्या सार्वजनिक अरोग्यव्यवस्थेमुळे

ड. नोकऱ्यांमध्ये वाढ झाल्यामुळे

(१) वरील सर्व (२) अ, ब व ड (३) अ, ब व क (४) अ आणि क

---

**४९.** खालील विधानांचा विचार करून योग्य उत्तराचा पर्याय निवडा :

अ. पूर्वीच्या काळी भारतीय शिक्षण व आरोग्य व्यवस्था आदर्श होती.

ब. सध्याच्या काळात भारतीय शिक्षण व आरोग्यव्यवस्था फारशी चांगली नाही.

(१) केवळ अ योग्य (२) केवळ ब योग्य (३) दोन्ही योग्य (४) दोन्ही अयोग्य

---

५०. खालील विधानांचा विचार करून योग्य उत्तराचा पर्याय निवडा.

अ. निरक्षरता, अनारोग्य, जमीन सुधारणेतील त्रुटी व शेतीविकासाकडे दुर्लक्ष या गोष्टीमुळे लोकशाहीवर संकट येण्याची शक्यता असते.

ब. विचारांची लढाई जिंकण्याऐवजी काहींना ती शक्तींचा वापर करून जिंकण्याची इच्छा असते.

(१) केवळ अ योग्य (२) केवळ ब योग्य (३) दोन्ही योग्य (४) दोन्ही अयोग्य

---

**Read the following passage and answer the question from 51 to 55**

People cannot take the law into their own hands. The rationale behind this reasoning is that the state is present to protect its citizens and to create an environment for the realization of human rights. Citizens only have a limited right vested in themselves to protect their or anyone else's persons or property which is guaranteed by the right of private defence. There in noright of private defence cases where there is adequate time to have recourse to public protection. Anyone employing his right of private defence must justify that there was no reasonable time to approach the state institutions for help. Thus citizens claim protection from the state for their welfare and it is the reciprocal obligation of the state to ensure the 'rule of law' through its institution.

The primary institution on which the state relies for the maintenance of law order is the police. In order to achieve this objective, the police are empowered to use limited coercive power thereby creating conditions for the realization of human rights. By virtue of being born a human, everybody has human rights which are inalienable and indivisible.

Human rights are core values which the police have a moral as well as a legal duty to uphold. This is the essential difference that distinguishes good policing from bad. While discharging their duty, police have to confront human rights. In order to ensure the security and safety of the common mass, police cannot belittle the rights of an individual or a marginalized community. They have to maintain the delicate balance between protecting human rights and preserving the security of the people, which though difficult, is not impossible to achieve. Unfortunately, Indian police choose the easy way out.

**51.** Identify the main idea of the passage

(1) To unfold the role of the government in regards to human rights and the protection of citizens

(2) To disclose the duality between human rights and the government's duty in the regard.

(3) To convince the importance of the right of private defence.

(4) To clarify the difference between good and bad systems of law and order.

---

**52.** Which of the following statements is/are not a part of the given passage ?

A) The right of private defence is the same as the right of public protection.

B) A true citizen is someone who does not take the law into his/her own hands.

(1) Only A (2) Only B (3) Both A & B (4) Neither A Nor B

---

**53.** According to the passage, if there is enough time to avail public protection, **______**

A) People can hold the government responsible if their life and property is harmed.

B) there will be no hindrance for the people to completely abide by the law.

C) People themselves would be supporters of the law and would be empowered to conserve the order.

(1) All except A, B (2) All except B,C (3) All Except A,C (4) All except A

---

**54.** Statement A – Police are permitted to use limited coercive force.

Statement B – Environment for the realization of human right is created.

(1) Statement A is right and statement B is it's correct reason.

(2) Statement A is right and statement B it's correct outcome.

(3) Statement B is correct, Statement A is incorrect.

(4) Statement B is right and statement A is it's correct outcome.

---

**55.** Which of the following inference's is/are correct on the basis of the information provided in the third paragraph?

A) Police downplay human rights for the security and safety of the masses.

B) Police should balance their act while defending the human rights and the safeguarding the people.

C) Police have to priorities the human rights.

(1) Only A (2) Only B (3) Only B & C (4) Only A & B

---

www.spandancareers.org

५६. तुम्ही एका कंपनीचे मालक आहात आणि तुम्हाला ती कंपनी विकायची आहे. एका बहुराष्ट्रीय कंपनीकडून यासाठी खूप मोठी रक्कम देऊन तुमची कंपनी विकायला तयार आहे. आणि तुम्हाला वाटते की यापेक्षा मोठी रक्कम अजून कोणी देऊ शकणार नाही. पण तुम्हाला हे पण कळले की ही तुमची कंपनी जर त्या कंपनीने विकत घेतली तर तुमच्या काही कर्मचाऱ्यांची नोकरी जाऊ शकते कारण त्या बहुराष्ट्रीय कंपनीमध्ये लागणारी कौशल्ये काही कर्मचाऱ्याकडे नाहीत. मग अशा वेळी तुम्ही काय कराल ?

(१) कंपनीचा लिलाव होण्यासाठी कर्मचाऱ्यांमध्ये आवश्यक असणाऱ्या कौशल्यांचे प्रशिक्षण शिबीर ठेवाल.

(२) कंपनी विकून द्याल, जर समोरच्या कंपनीला कर्मचारी ठेवायचे असतील तर ते ठेवतील नाहीतर काढून टाकतील.

(३) कंपनी विकणे टाळाल कारण कर्मचाऱ्यांमुळे तुमच्या कंपनीला ओळख मिळाली आहे.

(४) कंपनी विसताना जर ती कंपनी हया कर्मचाऱ्यांना काढून टाकणार नाही अशी हमी देत असेल तरच ती कंपनी विकाल.

---

५७. तुमच्याकडे एका गावातील काही पत्रकारांनी माहिती दिली आहे की, त्यांच्या गावातील स्वस्त धान्य दुकानात मोठया प्रमाणावर भ्रष्ट्राचार होत आहे. स्वस्त धान्या दुकानदार कोणालाच धान्य दिल्याच्या पावत्या देत नाही, सर्व सुविधा आधारकार्डशी जोडलेल्या आहेत तरी सुद्धा भ्रष्टाचार होत आहे असे तुम्हाला सांगण्यात आले. तुम्ही स्वतः जातीने चौकशी केली असता तुम्हाला कुठल्याही गैरप्रकार आढळला नाही, गावातील लोकांना विचारणा केली तर त्यांनी कोणीच तक्रार केली नाही परंतू पत्रकार म्हणतात हे सगळे भितीपोटी बोलत आहे, तर राशन दुकानदार म्हणतो ही पत्रकार मंडळी माझ्याकडून पैसे उकाळण्याचा प्रयत्न करतात आणि खोटया तक्रारी देतात, अशा परिस्थितीत तुम्ही पुरवठा अधिकारी म्हणून कोणता निर्णय घ्याल.

(१) त्या स्वस्त धान्य दुकानदाराचा धान्य पुरवठा काही दिवसांसाठी बंद कराल व पत्रकारांच्या मागण्यांना प्राधान्य द्याल.

(२) पत्रकारांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष करून हा विषय आहे तसाच ठेवाल, कारण तुम्हाला सर्व परिस्थिती योग्य दिसली.

(३) लोकांना आपल्या हक्काची जाणीव करून देऊन, काणत्याही परिस्थितीमध्ये घाबरू नका. तुमच्या काही तक्रारी असतील ती थेट माझ्याकडे द्या असे सांगून लोकांच्या मनातील भिती दूर करण्याचा प्रयत्न कराल.

(४) असे प्रकार सर्वच ठिकाणी होतात म्हणून या प्रश्नाकडे जाणीवपूर्वक दूर्लक्ष कराल.

---

५८. आपण एका प्राथमिक शाळेमध्ये शिक्षक म्हणून कामास आहात. आपल्या वर्गामध्ये एका मुलास अभ्यासामध्ये विशेष गती नसल्याचे तुमच्या लक्षात आले. तो इतर मुलांमध्ये न मिसळता एकटाच राहतो. त्याच्या या स्वभावामुळे इतर मुले त्यास आणखीच त्रास देतात. अशा परिस्थितीत त्या मुलाची मानसिक स्थिती सुधारावी आणि तो त्याच्या एककल्ली स्वभावातून बाहेर पडावा यासाठी एक आदर्श शिक्षक म्हणून तुम्ही काय कराल ?

(१) जी मुले त्रास देतात त्यांना शिक्षा करा व तसे न करण्याची सूचना द्या.

(२) त्या मुलाकडे विशेष लक्ष देवून पालक व सहशिक्षकाच्या मदतीने त्यास त्याच्या गोडीनुसार पाठयक्रम द्याल व त्यास सर्वांमध्ये मिसळण्यास प्रोत्साहन द्याल.

(३) त्या मुलाकडे विशेष लक्ष देवून त्यास सर्वांमध्ये मिसळण्यास प्रोत्साहित कराल पण त्याच्या गोडीनुसार अभ्यासक्रम देण्याऐवजी स्वतः चालू अभ्यासक्रमाबाबत त्याला अतिरिक्त मार्गदर्शक कराल.

(४) त्या मुलाच्या वर्तवणूकीबाबत मुख्याध्यापकांशी चर्चा कराल व त्यानुसार पुढील कार्यवाही कराल.

---

५९. आपण अबक जिल्हयाचे सार्वजनिक आरोग्य अधिकारी म्हणून कार्यरत आहात. आपल्या असे लक्षात आले आहे की, आपल्या जिल्हयातील एका विशिष्ट समाजातील नागरिक आपल्या मुलांना पोलिओचा डोस देण्यास नकार देत आहेत. याच समाजातील काही धर्मप्रमुख मुलांना पोलिओचा डोस देणे हे धर्माच्या विरूद्ध आहे असे सांगत आहेत. तसेच मुलांना हा डोस दिला तर मुले विकलांग होतात, नपुंसक होतात, किंवा दगावू शकतात हे सांगून या नागरिकांना प्रभावित करत आहे. आपला जिल्हा पोलिओमुक्त असून या समाजातील नागरिकांच्या चुकीच्या धारणांमुळे पुन्हा एकदा पोलिओ पसरण्याचा धोका आहे. अशावेळी आपण कोणती कृती कराल ?

(१) संबंधित धर्मगुरूंवर कडक कारवाई करण्याचा निर्णय घ्याल; या धर्मगुरूंची चौकशी करून त्यांना अटक करण्याचे आदेश द्याल.

(२) जिल्हयातील शाळांमध्ये आरोग्य अधिकारी पाठवून पोलिओ डोस मोहिम राबवण्याचा निर्णय घ्याल.

(३) प्रसिद्ध अभिनेत्याच्या मदतीने जिल्हयामध्ये जनजागृती मोहिम राबवाल व या समाजातील नागरिकांचे सर्व गैरसमज व चुकीच्या धारणा दूर करून पोलिओ डोस मोहिमेत सहभागी होण्याचे आवाहन कराल.

(४) मोहिमेच्या आधी नागरिकांच्या मनातील धारणा व समाज दूर करण्यासाठी जनजागृती मोहिम राबवाल त्याचप्रमाणे नागरिकांसाठी या मोहिमेत सहभाग घेणे बंधनकारक करण्याचा निर्णय घ्याल.

---

www.spandancareers.org

६०. आपण एक पुरूष पोलीस अधिकारी म्हणून कार्यरत आहात. रात्रीच्यावेळी आपण नेहमीच्या गस्त घालण्याच्या कामात आहात. मध्यरात्री एक वाजात आपल्याला निवासी इमारतीत काही तरूण पार्टी आणि धांगडधिंगा करत असल्याचा वायरलेसवर फोन येतो. त्याठिकाणी पोहोचल्यावर आपल्या असे लक्षात येते की मद्याच्या अमलाखानली काही तरूण मुले आणि मुली गोंधळ घालत आहेत. जोरजोरात गाणी लाऊन, आवाज करून ते गोंधळ घालत आहेत. त्यापैकी काही मुलामुलींनी अमली पदार्थांचे सेवन केल्याची आपल्याला शंका वाटत आहे. आपण जाऊन तो गोंधळ थांबवण्याचा प्रयत्न केला असता, त्यापैकी काही मुलीनी येऊन आपल्याशी वाद घालतात, चुकीच्या भाषेचा वापर करून, आपल्यावर आरडाओरडा करण्यास सुरूवात करतात. त्याचबरोबर या मुलींनी आपल्यासोबत धक्काबुक्की करण्याचा देखील प्रयत्न करतात. त्याठिकाणी आपल्यासोबत त्यावेळी महिला अधिकारी उपस्थित नाहीत. अशावेळी आपण कोणती कृती कराल ?

(१) परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी आपण मुलींशी वाद घालून वेळ पडल्यास त्यांना पोलिसांच्या ताब्यात घ्याल.

(२) कोणत्याही परिस्थितीमध्ये आपण मुलींशी वाद न घालण्याचा निर्णय घ्याल आणि तुमच्याशी असभ्य वर्तन करणाऱ्या मुलींना कडक ताकीद घ्याल. तसेच तातडीने जवळच्या पोलीस चौकीला अथवा कंट्रोल रूमला फोन करून महिला पोलीस अधिकाऱ्याना घटनास्थळी पाठवण्यास सांगाल. आपण शेजारच्या घरातील महिलांना मदत मागू शकता. तसेच घडलया प्रकाराचे व्हिडिओ रेकोर्डिंग कराल. आणि गरज पडल्यास सूर्योदयानंतर मुलींवर योग्य ती कारवाई कराल.

(३) कोणत्याही परिस्थितीमध्ये आपण मुलींशी वाद न घालण्याचा निर्णय घ्याल आणि तुमच्याशी असभ्य वर्तन करणाऱ्या मुलींना कडक शब्दात ताकीद द्याल. त्यांना तुमच्याशी सहकार्य करण्यास सांगाल. तसेच तुम्ही तातडीने जवळच्या पोलीस चौकीला अथवा कंट्रोल रूमला फोन करून महिला पोलीस अधिकाऱ्यांना घटनास्थळी पाठवण्यास सांगाल. आणि गरज पडल्यास सूर्योदयानंतर मुलामुलींवर योग्य ती कारवाई कराल.

(४) ज्या पोलीस चौकीमध्ये महिला पोलीस अधिकारी आहेत, त्या चौकीला तुम्ही वायरलेसवरचा फोन जोडून दयाल आणि आपल्या बरोबर महिला पोलीस अधिकारी आल्यावरच घटनास्थळी जाण्याचा निर्णय घ्याल.

---

**ALL THE BEST**

www.spandancareers.org

## FINAL ANSWER KEY- MARATHI [066] – [SET B]

| QUE | ANS | QUE | ANS | QUE | ANS | QUE | ANS |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **1** | 4 | **16** | 3 | **31** | 4 | **46** | 2 |
| **2** | 1 | **17** | 4 | **32** | 4 | **47** | 4 |
| **3** | 2 | **18** | 4 | **33** | 2 | **48** | 3 |
| **4** | 1 | **19** | 4 | **34** | 2 | **49** | 3 |
| **5** | 4 | **20** | 1 | **35** | 3 | **50** | 3 |
| **6** | 1 | **21** | 1 | **36** | 4 | **51** | 1 |
| **7** | 4 | **22** | 1 | **37** | 3 | **52** | 3 |
| **8** | 4 | **23** | 4 | **38** | 4 | **53** | 2 |
| **9** | 3 | **24** | 4 | **39** | 4 | **54** | 2 |
| **10** | 2 | **25** | 3 | **40** | 3 | **55** | 2 |
| **11** | 3 | **26** | 1 | **41** | 2 | | |
| **12** | 2 | **27** | 1 | **42** | 3 | | |
| **13** | 1 | **28** | 2 | **43** | 3 | | |
| **14** | 4 | **29** | 4 | **44** | 2 | | |
| **15** | 1 | **30** | 4 | **45** | 2 | | |

| | 1 | 2 | 3 | 4 |
|---|---|---|---|---|
| **56** | 2.5 | 0 | 1 | 1.5 |
| **57** | 1 | 2.5 | 1.5 | 0 |
| **58** | 0 | 1.5 | 2.5 | 1 |
| **59** | 0 | 1 | 1.5 | 2.5 |
| **60** | 0 | 1.5 | 2.5 | 1 |

www.spandancareers.org

"Save Paper, Save Tiger"